# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

---

**दिनांक ०८.०९.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०७.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १२ केसेसमध्ये १२ ईसमावर कारवाई करून एकुण १,५५,२३०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये ०५ इसमांवर कारवाई करून एकुण १३,५६०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,११० वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १०,०२,०००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

दिनांक ०७.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०८.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

**वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित,** असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ६ विशेष पथकाची कामगिरी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०७.०९.२०२६ चे १६.३० वा. चे दरम्यान, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ६ विशेष पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत गादा गावाजवळील गादा ते नेरी रोडवरील खसरा क्र. १८ या शेतामध्ये गोवंशीय जनावरे यांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष रेड कारवाई करुन परिसरात पाहणी केली असता, त्या ठिकाणी वेगवेगळया रंगाची लहान मोठी एकुण ११० गोवंशीय जनावरे यांना क्रुरपने व निर्दयतेने, दाटीवाटीने, चारापाण्याची व्यवस्था न करता, कत्तलीकरीता बांधून ठेवल्याचे दिसुन आले. नमुद जनावरांचे मालकाबाबत माहिती काढली असता, पोलीस पाटील यांनी नमुद शेत हे मुश्ताक कुरेशी रा. कामठी याचे असल्याचे सांगितले. शेतमालक आरोपी मुश्ताक कुरेशी जनावरांचा मालक असल्याचे समजले. घटनास्थळावरून एकुण ११० गोवंशीय जनावरे किंमती अंदाजे १९,१५,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी आरोपी शेतमालक याचेविरूध्द कलम ५(ब),९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)(एफ),११(१)(एच),११(१)(आय) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६०, अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६) यांचे मार्गदर्शनाखाली, विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :— दोन हद्दपार ईसमांना अटक.**

दिनांक ०७.०९.२०२६ रोजी १४.०० वा. ते १५.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार हे हद्दपार आरोपी चेक करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत, घर क्र. ७८, प्रेमनगर रोड, शांतीनगर येथे पंचासमक्ष घराची पाहणी केली असता, तेथे एक महिला व एक इसम मिळून आला. पंचासमक्ष त्यांना नाव पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांची नावे अनुक्रमे १) अफसाना धनिराम धनावत वय ४० वर्ष रा. गंगाजमुना वस्ती, ह.मु. घटनास्थळी, २) रवि उर्फ सतिश श्रावण कैकाडे वय ४२ वर्षे रा. गरोबा मैदान, माटे चौक, ह.मु. घटनास्थळी किरायाने, नागपूर असे सांगितले. इसमाची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी चाकु कि. ३००/— रु. चा मिळून आला. दोघांचाही गुन्हे अभिलेख तपासला असता, दोघांनाही पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेशान्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी महिला व इसम हे दोघेही हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने मिळुन आल्याने व त्यांनी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे शांतीनगर येथे महिला आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये व इसमाविरुध्द कलम १४२,१३५ मपोका सहकलम ४,२५ भाहका अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपी इसमास अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव शांतीनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. अतुल मोहनकर, पोउपनि मधुकर काठोके, वैभव गुंजाळ, पोहवा विजय श्रीवास, जितेश रेड्डी, दीपक लाकडे, चंद्रशेखर डेकाटे व मपोअं. अंकिता शाहाणे यांनी केली.



**३) सिताबर्डी पोलीसांची तत्परता :— महिलेची मुद्देमाल असलेली हरविलेली बॅग परत :**

दिनांक ०७.०९.२०२६ रोजी सायंकाळी १९.३० वा. चे सुमारास, तक्रारदार श्रीमती मोनिका संदीप शाहु वय ३२ वर्ष रा. चिंचडा, ता. मुलताई, जि. बैतुल, मध्यप्रदेश हया त्यांचे भाऊ, मुले व नातेवाईकासह झाँशी रानी चौक येथुन सिताबर्डी रेल्वे स्टेशन येथे ऑटोरिक्षाने गेल्या व तेथे उतरल्या. त्यांचेजवळील जांभळया रंगाची बॅग ऑटोरिक्षात विसरल्याचे त्यांचे लक्षात आले. चौकशी करुन त्या पोलीस ठाणे सिताबर्डी येथे आल्याने, दिवसपाळी अधिकारी व अंमलदार यांनी तत्परता दाखवून, तांत्रिक तपास केला व ऑटोरिक्षा क्रमांक निष्पन्न केला व त्या क्रमांकावरुन ऑटोरिक्षाचालकाचे नाव व संपर्क क्रमांक प्राप्त केला व त्याचेशी संपर्क साधला. ऑटोरिक्षा चालक नामे अहमदशाह अयुबशाह यास तातडीने पोलीस ठाणे येथे बोलावुन घेतले. ऑटोरिक्षामधील बॅग चेक केली असता, त्यामध्ये कपडे, इतर साहित्य तसेच सोन्याचे दागिने वजनी ४० ग्राम व चांदीचे दागिने असा एकूण कि. अंदाजे ६,१०,०००/— रु. चा मुद्देमाल सुरक्षित असल्याचे दिसुन आले. महिलेला नमुद बॅग परत करण्यात आली. सिताबर्डी पोलीसांनी तत्परता दाखवून महिलेस बॅग परत मिळवुन दिली.

बॅग शोधण्याची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास राऊत यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि देवानंद बगमारे, पोहवा रामेश्वर गिते, प्रलेश कापसे, पोअं. चेतन शेंडे, प्रशांत भोयर, मपोअं. अनिता वरखेडे व प्रणाली यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कळमणा :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०८.०९.२०२६ चे ००.२० वा. चे सुमारास, कळमणा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, आदिवासी प्रकाश नगर, गली क्र. १६ येथे एक इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम हा लोकांना

शिवीगाळ करुन धमकी देतांना मिळून आल्याने, त्यास ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राहुल उर्फ येडा सेवकराम डहरे वय २३ वर्षे रा. बाजार चौक, रिंग कुंवाजवळ, डिप्टी सिग्नल, कळमणा, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे मानकापुर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०६.०९.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक ०७.०९.२०२६ चे १२.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत प्लॉट क्र. ६२, निवास हाऊसिंग सोसायटी, ठाकरे आयटीआय रोड, काळे ले आऊट, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती रेखा रंजीत श्रीवास वय ५१ वर्ष हया आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह लहान भावाचे अंत्यसंस्काराकरीता बाहेरगावी गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे दारचे कुलूप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ७०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने, टायटन हातघडयाळ व रियलमी कंपनीचे चार्जर असा एकुण किंमती १,२८,३००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे पोउपनि. विनोद भोलाणे ९०४९९८९७१५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे अंबाझरी</u>:—** दिनांक ०७.०९.२०२६ चे १३.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत विवेकानंद स्मारकाकडील अंबाझरी तलावाचे पाण्यात पंपहाऊस जवळ एका ३० वर्ष वयाचे इसमाचा मृतदेह तरंगतांना मिळून आला. प्रेत पाण्याबाहेर काढुन मेयो हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले. मृतकाची ओळख पटलेली नव्हती प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती.

चौकशीत मृतकाचे नातेवाईक हजर आले. मृतकाचे नाव वैभव अमिताथ फुले वय २९ वर्ष रा. कस्तुरीनगर, बेसा, नागपूर असल्याचे निष्पन्न झाले. पुढील चौकशी सुरु आहे.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**